महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,गट-अ जिल्हा आरोग्य अधिकारी या संवर्गातील बदल्या / पदस्थापना...

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन आदेश क्रमांकः बदली-२०१९/प्र.क्र.१५६/सेवा-२
गो.ते.रुग्णालय संकुल इमारत, १० वा मजला,
मंत्रालय,मुंबई - ४०० ००१
तारीख: ३१ मे,२०१९

शासन आदेश -

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम,२००५ मधील कलम ४(४)(दोन) व ४(५) मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,गट-अ वेतनश्रेणी रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० मधील जिल्हा आरोग्य अधिकारी या संवर्गातील अधिकाऱ्यांची खालीलप्रमाणे बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे :-

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव व सध्याची पदस्थापना	बदलीने पदस्थापना
१	२	३
१	डॉ.बाळासाहेब गणपत चव्हाण अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी,धुळे	जिल्हा आरोग्य अधिकारी, यवतमाळ या डॉ. डी.जी.चव्हाण यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदी (ज्येष्ठतेनुसार)
२	डॉ.प्रकाश मगन पाडवी सहा संचालक, आरोग्य सेवा(कुष्ठरोग),नाशिक	सहायक संचालक, आरोग्य सेवा,मुंबई (रिक्त पदी) (विनंतीनुसार)
३	डॉ. अनिरुध्द अच्युत आठल्ये जिल्हा आरोग्य अधिकारी,रत्नागिरी	जिल्हा आरोग्य अधिकारी, सातारा या डॉ. पवार यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदी (विनंतीनुसार)
४	डॉ.दिलीप नारायण पांडे सहा संचालक, आरोग्य सेवा(कुष्ठरोग),चंद्रपूर	सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी, धारणी, जिअमरावती. (रिक्त पदी)

२. बदली झालेल्या अधिकाऱ्यांना एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत असून कार्यमुक्तीचे संचालनालयाकडील / संचालनालयाच्या संबंधीत कार्यालयाकडील स्वतंत्र वेगळया आदेशाची वाट न पाहता बदली झालेल्या ठिकाणी म.ना.से.(पदग्रहण अवधी, परकीय सेवा आणि निलंबन...) नियम १९८१ मधील नियम १० अनुसार अनुज्ञेय पदग्रहण अवधीत बदलीच्या पदावर रुजू व्हावे. अन्यथा, त्यांच्यावर प्रचलित नियमानुसार जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगाची

कारवाई प्रस्तावित करण्यात येईल. तसेच पदग्रहण अवधीनंतर रुजू होण्याच्या दिनांकापर्यंतचा कालावधी हा अनधिकृत गैरहजेरी समजून तो कालावधी सेवेतील खंड समजण्यात येईल.

३. बदली झालेल्या अधिकाऱ्यांना कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करण्यात येऊ नये, अन्यथा रजा मंजूर करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

४. संबंधीत जिल्हा कोषागार अधिकारी / अधिदान व लेखा अधिकारी मुंबई यांनी अन्यत्र बदली झालेल्या संबंधीत वैद्यकीय अधिकाऱ्यांचे माहे जून,२०१९ व त्यापुढील महिन्याचे वेतन कोणत्याही परिस्थितीत बदलीपूर्वीच्या पदावर काढू नये.

५. जे अधिकारी त्यांच्या पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होणार नाहीत त्यांचेविरुध्द संचालनालयाने वेळीच प्रशासकीय कारवाई सुरु करावी व आवश्यकतेनुसार प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावा. या प्रकरणी वेळोवेळी शासनास अवगत करावे व अनुपालन अहवाल शासनास विहित कालमर्यादेत सादर करावा.

६. बदली झालेल्या अधिकाऱ्यांनी बदलीच्या आदेशात बदल करुन घेण्यासाठी किंवा रद्द करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास संबंधीताची कृती गैरवर्तवणूक समजण्यात येईल व असे अधिकारी शिस्तभंग विषयक कारवाई करण्यास पात्र ठरतील.

७. सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५३१११११२१२३०१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vishnudas Pundlikrao Ghodke

Digitally signed by Vishnudas Pundlikrao Ghodke
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=514c2e5ad6ac71c69b99a86a5fe5189556b7a95d5896bbb81496f403bb58ac3e, serialNumber=9ab69d6945f8950a9525831f8ae9726be295d17576e78d19fa8f6cb952bb04a0, cn=Vishnudas Pundlikrao Ghodke
Date: 2019.05.31 23:13:33 +05'30'

(वि.पुं.घोडके)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई
२) प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एडस् नियंत्रण सोसायटी,मुंबई
३) संचालक, आरोग्य सेवा,मुंबई

४) अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (सर्व)
५) सह संचालक, आरोग्य सेवा(सर्व)
६) उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)
७) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय (सर्व)
८) अधीक्षक, मनोरुग्णालय (सर्व)
९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१०) निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई
११) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१ मुंबई / महाराष्ट्र-२ नागपूर
१२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ मुंबई / महाराष्ट्र-२ नागपूर
१३) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१४) मा.मंत्री (सा.आ.) / मा.राज्यमंत्री (सा.आ.) यांचे खाजगी सचिव
१५) प्रधान सचिव (सा.आ.) यांचे स्वीय सहायक
१६) सर्व संबंधित अधिकारी (संचालक, आरोग्य सेवा यांच्या मार्फत)
१७) निवड नस्ती (सेवा-२)